नि.दि.दावा क्र.२७/२०२४

शेख मुसा –वि.– आसमा शेख मुसा

नि.क्र. १८

<u>**वादीचे सा.क्र. ०१ पुढील सरतपास वादीचे श्री. सी. बी. देशमुख यांच्यामार्फत शपथेवर सुरू**</u>

११. माझे पुराव्याचे शपथपत्र माझ्या सांगण्यानुसार लिहिले असून त्यावर मी वाचून समजून सही केली आहे. ते नि.क्र. १८ वर आहे.

१२. आता मला प्रतिवादीला पाठविण्यात आलेल्या नोटीसची कार्यालयीन प्रत दाखविण्यात आली. त्यावर माझी व दोन साक्षीदारांची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला **नि.क्र.१९** देण्यात येते. आता मला नोटीस पाठविल्याची पोष्टाची पावती व पोच पावती दाखविण्यात आली. त्यांना **नि.क्र.२० व २१** देण्यात येते. आता मला मुस्लीम शरीयत कायद्यानुसार पाठविलेल्या दुसऱ्या नोटीसची मुळप्रत दाखविण्यात आली. त्यावर माझी व दोन साक्षीदारांची सही आहे. त्याला **नि.क्र.२२** देण्यात येते. आता मला नोटीस पाठविल्याची पोष्टाची पावती दाखविण्यात आली. तिला **नि.क्र. २३** देण्यात येते. आता मला नि.क्र. २२ वर असलेली नोटीस परत आली त्याचा लिफाफा दाखविण्यात आला. त्याला **नि.क्र.२४** देण्यात येते. आता मला मुस्लीम शरीयत कायद्यानुसार प्रतिवादीला पाठविलेली नोटीसची कार्यालयीन प्रत दाखविण्यात आली. त्यावर माझी व दोन साक्षीदारांची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला **नि.क्र.२५** देण्यात येते. आता मला नोटीस पाठविल्याची पोष्टाची पावती दाखविण्यात आली. त्याला **नि.क्र.२६** देण्यात येते. आता मला नि.क्र.२५ नुसार पाठविलेली नोटीस परत आल्याचा लिफाफा दाखविण्यात आला. त्याला **नि.क्र.२७** देण्यात येते.

<u>**सरतपास संपला.**</u>

<u>**प्रतिवादी व त्याचे विधीज्ञ यांचा ०३.३५ वाजेपर्यंत वारंवार पुकारा केला असता गैरहजर. त्यामुळे साक्षीदाराचा उलटतपास नाही.**</u>

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्वीकृत | माझे समक्ष |
| स्वा/– | स्वा/– |
| (एन. डी. मेश्राम ) | (एन. डी. मेश्राम ) |
| दि.न्या.क.स्तर, शेगांव कोर्ट क्र.१ ले, | दि.न्या.क.स्तर,शेगांव कोर्ट क्र.१ ले, |
| दि. १२.०९.२०२५ | दि. १२.०९.२०२५ |